(२)

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ४३६७ दि.- २८/०२/२०१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - २६/०२/२०१८

दिनांक - दुपारी ०३.३० वा.

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत**
१९/६, क्लासिक विहार,
पुण्याई नगर, धनकवडी, पुणे ४११०४३. } **अपिलार्थी**

**श्रीमती रश्मी एकबोटे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक**

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक १६/०१/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक १६/०१/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी दि.१२/०१/१८ रोजी मा.नगरसेवक राजेंद्र शिळीमकर याच्या वाढदिवसानिमित्त संपुर्ण प्रभागामध्ये हार्दिक अभिनंदनाचे जे जहिरात फलक लावले त्याबाबतच्या अभिलेखाची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| १६/०१/२०१८ | १६/०१/२०१८ | १४/०२/२०१८ | १२/०२/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती समाधानकारीरित्या न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १४.०२.२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| १४/०२/२०१८ | १४/०२/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.२६/०२/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा. जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|
| प्रश्न क्र.१ बाबत | या कार्यालयाकडे परवानगीसाठी कोणताही अर्ज सादर करण्यात आलेला नाही. |
| प्रश्न क्र.२ बाबत | फलक लावण्यासाठी कोणत्याही स्वरूपाची परवानगी या कार्यालयामार्फत देण्यात आलेली नाही. फलक परवानगीसाठीची आवश्यक कोणतीही कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली नाहीत. मा.नगरसेवक श्री.राजेंद्र शिळीमकर यांना फलक लावणेसाठी या कार्यालयाकडून कोणतेही चलन देण्यात आलेले नाही. मे.उच्च न्यायालयाशी पत्रव्यवहार |

| | |
|---|---|
| | केल्याचे आढळ होत नाही. संबंधित निरीक्षकाची तत्काळ बदली करण्यात आली आहे. आ.क्र.६६८८ दि.०६/०२/१८ ने प्राप्त कार्यालयीन आदेशाची प्रत सोबत जोडली असे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २६/०२/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्रीमती रश्मी एकबोटे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा परवाना व आकाशचिन्ह निरिक्षक श्री.बाळासाहेब जाधव व श्री.किशोर दळवी हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती समाधानकाररित्या न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

➢ जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जास दिलेल्या माहितीबाबत त्यांनी केलेल्या विवेचनामुळे अपिलार्थी श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत यांचे समाधान झाल्याने जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायम करणेत येत आहे. सबब सदरचा अपिल अर्ज निकाली काढणेत येत आहे.

कळावे,

24.02.18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

**<u>टिप –</u>**

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत, रा.१९/६, क्लासिक विहार, पुण्याई नगर, धनकवडी, पुणे ४११०४३.
२. श्री.रश्मी एकबोटे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.बाळासाहेब जाधव व किशोर दळवी सहा.जनमाहिती अधिकारी तथा परवाना व आकाशचिन्ह निरिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.